औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सह संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे विभाग, पुणे कार्यक्षेत्र-२**

महाराष्ट्र कामगार कल्याण भवन, तिसरा मजला, प्लॉट नं. जी.पी. १६३, संभाजीनगर बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय समोर, एमआयडीसी (थरमॅक्स चौक), चिंचवड पुणे ४११०१९

दुरध्वनी क्र.०२०-२७३७१०३२ ईमेल- jd२dish.pun-mh@gov.in

जा.क्र ससंऔसुवआ/ ३५९ /२६ दिनांक - 23/04/2026

प्रति,

भोगवटादार /व्यवस्थापक

विषय —"कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक ( प्रतिबंध, मनाई व निवारण ) अधिनियम, २०१३" या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत

संदर्भ —१. मा. विधीतज्ञ, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक ममआ/एप्रिल-२६/सुमोटो गा/का-०५/१५७६, दि.१६/०४/२०२६.

२. मा. जिल्हाधिकारी , पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र.जिमबाविअपुणे/मवि/२०२७-२७/१८७१ दि.२०/०४/२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी यांचे "कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक ( प्रतिबंध, मनाई व निवारण ) अधिनियम, २०१३" या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत निर्देश प्राप्त झाले आहेत तरी सोबत जोडलेल्या पत्राप्रमाणे कार्यवाही करावी व जोडलेल्या नमुन्यामध्ये माहिती lcpune2021@gmail.com मेल करावी तसेच एक प्रत या कार्यालयाास मेल करावी.

आपला विश्वासू,

(सं. ज. गिरी)

सह संचालक

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,

पुणे का.क्षे.२

# महाराष्ट्र शासन
# जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे कार्यालय

पंडीत जवाहरलाल नेहरु उदयोग केंद्र परिसर,बिडी कामगार वसाहत,
गोल्फ क्लब रोड, आंबेडकर चौक, येरवडा, पुणे– ४११००६.

फोन नं. ०२०-२९९९११५६८ Email ID : jimbapune@gmail.com

जा.क्र. जिमबाविअपुणे/मवि/ २०२६-२७/ 1871 दि. 20/4/2026

प्रति,

कार्यालय प्रमुख,

---------- (सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक प्राधिकरणांची कार्यालये) -------, जि. पुणे.

**विषय-** प्रसारमाध्यमांवर प्रसिध्द झालेल्या नाशिक येथील आयटी कंपनीमधील लैंगिक छळ प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हयातील सर्व कंपन्यांमध्ये कायदयाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याबाबत.

**संदर्भ-** मा. विधीतज्ञ, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. ममआ/ एप्रिल-२६/ सुमोटो-गां/ का-०५/ १५७६, दि. १६/०४/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, नाशिक येथील आयटी कंपनीमधील लैंगिक छळाची घटना ही कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता निर्माण करणारी आहे. पुणे हे महाराष्ट्रातील एक प्रमुख आयटी हब असून, येथे मोठया प्रमाणावर महिला कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, मा. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांनी संपूर्ण पुणे जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये PoSH कायदयाची अंमलबजावणी तपासण्याकरीता विशेष तपासणी मोहीम राबविण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, 2013 चे कलम ४ चे तरतुदींनुसार किंवा महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मकचौ-2013/ प्र.क्र. 63/ मकक, दि. 19/06/2014 च्या तरतुदींनुसार ज्या शासकीय किंवा खाजगी कार्यालयांमध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत, त्या कार्यालयांमधील लैंगिक छळवणूकीच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी संबंधीत कार्यालयांमध्ये अंतर्गत समिती (विशाखा समिती) स्थापन करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त २०१३ च्या अधिनियमाचे कलम ६(२) नुसार ज्या कार्यालयांमध्ये १० पेक्षा कमी कर्मचारी कार्यरत असल्यामुळे अंतर्गत समिती स्थापन करण्यात आलेली नाही किंवा लैंगिक छळवणुकीची तक्रार ही कार्यालय प्रमूख किंवा मालकाविरुध्द आहे, अश्या तक्रारींची चौकशी करण्याचे अधिकार हे उपरोक्त अधिनियमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या स्थानिक समितीस आहेत.

लैंगिक छळवणुकीच्या घटनांबाबत पिडीत महिलांना गोपनीयपणे आणि आत्मविश्वासाने online तक्रार करता येण्यासाठी, भारत सरकारने पिडीत महिलांसाठी SHe-Box Portal (https://shebox.wcd.gov.in) सुरु केलेले आहे. सदर Portal वर प्राप्त तक्रारींवरती कार्यवाही होण्यासाठी, पुणे जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांनी त्यांच्या अंतर्गत समित्यांची नोंदणी SHe-Box Portal वर करणे आवश्यक आहे.

सदर पोर्टलवरील Private Head Office Registration येथे क्लिक करुन खाजगी कार्यालयांना त्यांची नोंदणी करता येते, तर सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयांची SHe-Box Portal वर नोंदणी करण्याचे काम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांचे कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. Portal वर नोंदणी होण्यासाठी शासकीय, निमशासकीय व स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयांनी खालील मुददयांची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, पुणे या कार्यालयाच्या lcpune2021@gmail.com (एल सी पुणे २०२१) या ईमेलवर पाठविणे आवश्यक आहे.

1) Name of the Department of Government -
2) Office Name -
3) Name of Head of Office –
4) Official Email ID –
5) Official Contact no. –
6) Pincode –
7) Office Address –

तरी, मा. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे निर्देशानुसार आपले कार्यालयातील PoSH कायदयाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांचे कार्यालयास lcpune2021@gmail.com (एल सी पुणे २०२१) या ईमेलवर दि. 04/05/2026 रोजी पर्यंत पाठवावा.

त्याचप्रमाणे, आपले कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांमध्ये आणि आपले कार्यालयाने नोंदणी प्रमाणपत्र / परवाना / मान्यता दिलेल्या सर्व खासगी कार्यालयांमध्ये PoSH कायदयाची अंमलबजावणी तपासण्याकरीता विशेष तपासणी मोहीम राबवुन, सर्व अधिनस्त व खासगी कार्यालयांचे तपासणी अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांचे कार्यालयास lcpune2021@gmail.com (एल सी पुणे २०२१) या ईमेलवर दि. 04/05/2026 रोजी पर्यंत पाठवावे. अंमलबजावणी किंवा तपासणी अहवालाचा नमुना यासोबत जोडलेला आहे.

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मकचौ-2025/ प्र.क्र.25/ का-15, दि. 22/08/2025 च्या तरतुदीनुसार उपरोक्त 2013 च्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार जिल्हा अधिकारी (District Officer) यांना असल्यामुळे अंतर्गत समिती स्थापन केली नसल्यास कलम 26 नुसार रु. 50,000 पर्यंत दंडात्मक कारवाई ही जिल्हा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. 17, पुणे यांच्या स्तरावरुन करण्यात येते. त्यामुळे, कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, 2013 च्या तरतुदींचे ज्या आस्थापनांमध्ये पालन होत नाही, त्या आस्थापनेचे कार्यालय प्रमुख किंवा मालकाविरुध्द कडक दंडात्मक कारवाई होण्यासाठी, संबंधीत आस्थापनेचे प्रकरण जिल्हा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. 17, पुणे यांचे कार्यालयाकडे पाठवावे.

<u>सोबत</u> - अंमलबजावणी किंवा तपासणी अहवालाचा नमुना.

(जितेंद्र डूडी)
जिल्हाधिकारी, पुणे.

# कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३

## अंतर्गत

## तपासणी किंवा अंमलबजावणी अहवाल

१) आस्थापनेचा प्रकार (शासकीय / निमशासकीय / स्थानिक प्राधिकरण / खासगी) - ....................

२) आस्थापनेची माहिती

२.१) आस्थापनेचे नाव - ....................................................................................................

२.२) आस्थापनेचा सविस्तर पत्ता (पिनकोड सह) - ............................................................

..........................................................................................................................................

२.३) आस्थापनेचा ईमेल आयडी - ........................................................................................

२.४) आस्थापनेचा संपर्क क्रमांक - ......................................................................................

३) आस्थापना सुरु करण्यासाठी किंवा आस्थापना स्थापन करण्यासाठी शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र / परवाना / मान्यता आवश्यक असल्यास, सदर नोंदणी प्रमाणपत्र / परवाना / मान्यतेबाबतची माहिती (नोंदणीप्रमाणपत्राची / परवान्याची / मान्यतेची प्रत सादर करावी) - ........

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

४) आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत का ? - (१० किंवा १० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत नसल्यास चालु महिन्याच्या उपस्थिती रजिस्टरची प्रत सादर करावी) - ....................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

५) १० किंवा १० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असल्यास, आस्थापनेमध्ये अंतर्गत समिती स्थापन करण्यात आलेली आहे का ? (समिती स्थापन केल्याबाबतच्या आदेशाची प्रत तसेच समितीच्या अध्यक्ष व सदस्यांची नावे, लिंग, पद, पत्ता व संपर्क क्रमांक नमुद असलेली यादी सादर करावी) - ..........................................................................................................

..............................................................................................................................................................................

..............................................................................................................................................................................

५.१) अंतर्गत समिती स्थापन केल्याबाबतचा आणि लैंगिक छळवणुकीच्या दंडात्मक परिणामांबाबतचा फलक हा आस्थापनेच्या दर्शनी भागात लावण्यात आलेला आहे का ? (फलकाचा फोटो सादर करावा) - ..............................................................................

..............................................................................................................................................................................

..............................................................................................................................................................................

५.२) सदर फलकावर महिला हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक - १८१, आपात्कालीन हेल्पलाईन क्रमांक - ११२ व उपरोक्त २०१३ च्या अधिनियमांतर्गत नियुक्त केलेल्या शासकीय समन्वय अधिका-यांचा (Nodal Officers) संपर्क क्रमांक उपरोक्त फलकामध्ये नमुद करण्यात आलेला आहे का ? - ..............................................................

६) अंतर्गत तक्रार निवारण समिती (IC) विधिवत स्थापन आहे का आणि अंतर्गत समितीमध्ये कायदयानुसार आवश्यक बाह्य सदस्य नेमले आहेत का ? (समर्थनीय कागदपत्रे सादर करावी.)

६.१) अंतर्गत समितीच्या अध्यक्षा हया कार्यालयातील वरिष्ठ स्तरावरील महिला अधिकारी / कर्मचारी आहेत का ? - ..........................................................................................................

..............................................................................................................................................................................

६.२) अंतर्गत समितीच्या किमान २ सदस्या हया महिलांचे अधिकार व कल्याणाकडे विशेष लक्ष देणारे कर्मचारी किंवा लक्ष देण्यास बांधील / वचनबध्द असणारे कर्मचारी **अथवा** सामाजिक कार्याचा अनुभव असलेले कर्मचारी **अथवा** कायदयाचे ज्ञान असलेले कर्मचारी आहेत का ? - ........

..............................................................................................................................................................................

..............................................................................................................................................................................

६.३) अंतर्गत समितीच्या १ सदस्या हया महिलांचे अधिकार व कल्याणाकडे विशेष लक्ष देणा-या किंवा लक्ष देण्यास बांधील / वचनबध्द असणा-या अशासकीय संस्थेचे पदाधिकारी **अथवा** लैंगिक

छळवणुकीच्या विषयाशी परिचीत असलेली व्यक्ती म्हणजे -

या विषयाचे विशेष ज्ञान / कौशल्य असलेली व्यक्ती **आणि** महिला सक्षमीकरणाबाबत व कामाच्या ठिकाणच्या लैंगिक छळवणुकीचा प्रश्न सोडवण्याबाबत किमान 5 वर्षांच्या सामाजिक कार्याचा अनुभव असलेले सामाजिक कार्यकर्ते **किंवा** कामगार, सेवा, दिवाणी / फौजदारी कायदयांशी परिचीत असलेली व्यक्ती आहेत का ? - ..............................................................................

..............................................................................

..............................................................................

६.४) अंतर्गत समिती मधील किमान ५० % सदस्या हया महिला आहेत का ? - ..............................

७) सर्व कर्मचा-यांना PoSH कायदयाबाबत जागरुकता व संवेदनशीलता प्रशिक्षण देण्यात आले आहे का ?

७.१) आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांसाठी कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक (संरक्षण, प्रतिबंध व निवारण) कायदा, 2013 या कायदयाविषयी सन 2025 मध्ये घेण्यात आलेल्या सर्व कार्यशाळांची / जाणीवजागृतीच्या व संवेदनशीलता कार्यक्रमांची / बैठकांची एकुण संख्या किती आहे ? (त्याबाबतचे फोटो / कागदपत्रे सादर करावे) - ..............................

..............................................................................

..............................................................................

८) तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुरक्षित, गोपनीय व पारदर्शक आहे का ?

८.१) लैंगिक छळवणुकीची तक्रार नोंदविण्यासाठी आस्थापनेमध्ये कोणती सुविधा उपलब्ध आहे?-

..............................................................................

..............................................................................

८.२) आस्थापनेची SHe-Box Portal वर नोंदणी झालेली आहे का ? - ..............................

८.३) आस्थापनेच्या संकेत स्थळावर आणि प्रचार प्रसिध्दीसाठी उपलब्ध असलेल्या आस्थापनेच्या अधिकृत माध्यमांवर (Social Media) SHe-Box Portal चा संकेतस्थळ उपलब्ध आहे का ? -

..............................................................................

..............................................................................

९) कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ अंतर्गत सन २०२५ च्या वार्षीक अहवालाची प्रत मा. जिल्हा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. १७, पुणे यांचे कार्यालयात किंवा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, पुणे येथे सादर केलेला आहे का ? (वार्षीक अहवालाची प्रत सादर करावी) -

.................................................................................................................................

.................................................................................................................................

तपासणी अधिकारी / कार्यालय प्रमुख / मालक यांची दिनांकीत स्वाक्षरी - ............................................

नाव - ........................................................................................................................

पद - ..........................................................................................................................

आस्थापनेचे नाव - ..........................................................................................................

.................................................................................................................................